# जिल्हा निवड समिती जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम

## (नगर परीषदामध्ये राज्य स्तरीय संवर्गातील रिक्त पदे सरळ सेवेने भरणेबाबतची जाहीरात)

## जाहीरात क्र.कक्ष-१/आस्था/अका/कावि-९५/२०१७ दिनांक १३/०२/२०१७

मा. प्रधान सचिव, नगर परीषद प्रशासन संचालनालय , मंत्रालय, मुंबई यांचे परीपत्रक क्रं. भरती/२०१५/ प्र.क्र.१४/कक्ष ६/४३१ दि. २२/०२/२०१६ अन्वये जिल्हाधिकारी वाशिम यांचे अस्थापनेवरील वाशिम जिल्हयातील नगर परीषदामध्ये राज्य स्तरीय संवर्गातील श्रेणी क मधील रिक्त पदे सरळ सेवेने भरावयाची आहेत त्यानुसार इच्छुक व पात्र उमेदवाराकडुन **दि. १४/०२/२०१७ ते २३/०२/२०१७** पर्यंत ऑनलाईन (Online) पध्दतीने www.washim.nic.in या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज मागविण्यांत येत आहे. रिक्त पदांची माहिती खालील प्रमाणे.

| अ.क्रं | पदाचे नांव व वेतन श्रेणी | भरावयाची पदे |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र नगर परीषद अभियांत्रीकी सेवा पर्यवेक्षक (स्थापत्य ) (श्रेणी क )<br>वेतन श्रेणी ९३००-३४८०० ग्रे.पे.४२०० | ४ |
| २. | महाराष्ट्र नगर परीषद अभियांत्रीकी सेवा पर्यवेक्षक (विदयुत ) (श्रेणी क )<br>वेतन श्रेणी ९३००-३४८०० ग्रे.पे.४२०० | १ |
| ३. | महाराष्ट्र नगर परीषद अभियांत्रीकी सेवा पर्यवेक्षक (संगणक ) (श्रेणी क )<br>वेतन श्रेणी ९३००-३४८०० ग्रे.पे.४२०० | १ |
| ४. | महाराष्ट्र नगर परीषद लेखापरीक्षण व सहाय्यक लेखा परीक्षण (श्रेणी क )<br>वेतन श्रेणी ९३००-३४८०० ग्रे.पे.४२०० | १ |
| ५. | महाराष्ट्र नगर परीषद कर निर्धारक व प्रशासकीय सेवा (श्रेणी क-२ )<br>वेतन श्रेणी ५२००-२०२०० ग्रे.पे.२८०० | १८ |
| ६. | महाराष्ट्र नगर परीषद अग्नी शमन सेवा संवर्ग (श्रेणी क-२ )<br>वेतन श्रेणी ५२००-२०२०० ग्रे.पे.२८०० | ८ |

उपरोक्त पदासाठी संपुर्ण जाहिरात, शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा, सामाजीक व समांतर आरक्षण, विहीत परीक्षा शुल्क अर्ज करावयाची पध्दत,विविध महत्वाचे दिनांक परीक्षेबाबतची माहीती व इतर सुचना सविस्तरपणे वाशीम जिल्हयाच्या www.washim.nic.in या अधिकृत संकेस्थळावर व कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर उपलब्ध आहे.

दि. १४.२.२०१७
ठिकाण - वाशिम

स्वा/-
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा निवड समिती वाशिम

# जिल्हा निवड समिती जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम

**(नगर परीषदामध्ये एकुण विविध संवर्गातील रिक्त पदे: ३३)**

**पदनिहाय रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे**

मा. प्रधान सचिव, नगर परीषद प्रशासन संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांचे परीपत्रक क्रं. भरती/ २०१५/ प्र.क्र.१४/कक्ष ६/४३१ दि. २२/०२/२०१६ अन्वये जिल्हाधिकारी वाशिम यांचे अस्थापनेवरील वाशिम जिल्हयातील नगर परीषदामध्ये राज्य स्तरीय संवगातील श्रेणी क मधील रिक्त पदे सरळ सेवेने भरावयाची आहेत त्यानुसार इच्छुक व पात्र उमेदवाराकडुन दि.२३/०२/२०१७ पर्यंत ऑनलाईन (Online) पध्दतीने अधिकृत संकेतस्थळावर अर्ज मागविण्यांत येत आहे.

Online व्यतीरिक्त अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

Online www.washim.nic.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**जाहिरातीमध्ये नमुद पदासांठी आवश्यक अर्हता/पात्रता नसलेल्या उमेदवारांनी अर्ज सादर करु नयेत.**

**पदभरतीचा कार्यक्रम :-**

| अ.क्रं | कालबध्द कार्यक्रमानुसार करावयाची कार्यवाही | कालावधी दिनांकापासुन पर्यंत |
|---|---|---|
| १ | जाहिरात प्रसिद्ध करणे | १४/०२/२०१७ |
| २ | अर्ज करण्याचा कालावधी | १४/०२/२०१७ ते २३/०२/२०१७ |
| ३ | लेखी परीक्षा दिनांक | ०५/०३/२०१७ |

**दिनांक ०५/०३/२०१७ रोजी घेण्यात येणाऱ्या परीक्षांची वेळ खालीलप्रमाणे -**

| अ.क्रं | पदाचे नांव | लेखी परीक्षेची वेळ |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र नगर परीषद अभियांत्रीकी सेवा पर्यवेक्षक (स्थापत्य ) (श्रेणी क ) | सकाळी ११.०० ते १.०० वा. |
| २. | महाराष्ट्र नगर परीषद अभियांत्रीकी सेवा पर्यवेक्षक (विदयुत ) (श्रेणी क ) | सकाळी ११.०० ते १.०० वा. |
| ३. | महाराष्ट्र नगर परीषद अभियांत्रीकी सेवा पर्यवेक्षक (संगणक ) (श्रेणी क ) | सकाळी ११.०० ते १.०० वा. |
| ४. | महाराष्ट्र नगर परीषद लेखापरीक्षण व सहाय्यक लेखा परीक्षण (श्रेणी क ) | सकाळी ११.०० ते १.०० वा. |
| ५. | महाराष्ट्र नगर परीषद कर निर्धारक व प्रशासकीय सेवा (श्रेणी क-२ ) | दुपारी ३.०० ते ५.०० वा. |
| ६. | महाराष्ट्र नगर परीषद अग्नी शमन सेवा संवर्ग (श्रेणी क-२ ) | सकाळी ११.०० ते १.०० वा. |

# जिल्हा निवड समिती जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम

### (नगर परीषदामध्ये एकुण विविध संवर्गातील रिक्त पदे: ३३)

### पदनिहाय रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे

**१.संवर्ग - महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रीकी सेवा पर्यवेक्षक (स्थापत्य)**

**पदाचे नांव - पर्यवेक्षक (स्थापत्य)**

**भरावयाची एकुण पदे - ४**

| अनुशेषाचा प्रवर्ग | एकुण रिक्त पदे | समांतर आरक्षण | | | | | | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महिला | माजी सेनिक | खेळाडु | प्रकल्पग्रसत /भुकंपग्रस्त | अंशकालीन | अपंग | |
| टक्केवारी | | ३०% | १५% | ५% | ५% | ५% | ३% | |
| अ.जा. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अ.ज. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| वि.जा.अ.<br>भ.ज.ब.<br>भ.ज.क.<br>भ.ज.ड. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| इ.मा.व. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| वि.मा.प्र. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| एकुण | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ |

## २. संवर्ग - महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रीकी सेवा कनिष्ठ विदयुत

**पदाचे नांव - कनिष्ठ विदयुत पर्यवेक्षक**

**भरावयाची एकुण पदे -१**

| अनुशेषाचा प्रवर्ग | एकुण रिक्त पदे | समांतर आरक्षण | | | | | | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महिला | माजी सेनिक | खेळाडु | प्रकल्पग्रसत /भुकंपग्रस्त | अंशकालीन | अपंग | |
| टक्केवारी | | ३०% | १५% | ५% | ५% | ५% | ३% | |
| अ.जा. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अ.ज. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| वि.जा.अ. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भ.ज.ब. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भ.ज.क. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भ.ज.ड. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| इ.मा.व. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| वि.मा.प्र. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खुला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकुण | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |

## ३. संवर्ग - महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रीकी सेवा पर्यवेक्षक संगणक

### पदाचे नांव - पर्यवेक्षक संगणक

**भरावयाची एकुण पदे -१**

| अनुशेषाचा प्रवर्ग | एकुण रिक्त पदे | समांतर आरक्षण | | | | | | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महिला | माजी सेनिक | खेळाडु | प्रकल्पग्रसत /भुकंपग्रस्त | अंशकालीन | अपंग | |
| टक्केवारी | | ३०% | १५% | ५% | ५% | ५% | ३% | |
| अ.जा. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अ.ज. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| वि.जा.अ. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भ.ज.ब. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भ.ज.क. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भ.ज.ड. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| इ.मा.व. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| वि.मा.प्र. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खुला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकुण | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |

## ४. संवर्ग - महाराष्ट्र नगर परिषद प्रशासकीय सेवा सहाय्यक लेखापाल

### पदाचे नांव : सहाय्यक लेखापाल

**भरावयाची एकुण पदे -१**

| अनुशेषाचा प्रवर्ग | एकुण रिक्त पदे | समांतर आरक्षण | | | | | | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महिला | माजी सैनिक | खेळाडु | प्रकल्पग्रसत /भुकंपग्रस्त | अंशकालीन | अपंग | |
| टक्केवारी | | ३०% | १५% | ५% | ५% | ५% | ३% | |
| अ.जा. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अ.ज. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| वि.जा.अ. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भ.ज.ब. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भ.ज.क. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भ.ज.ड. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| इ.मा.व. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| वि.मा.प्र. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खुला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकुण | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |

## ६. संवर्ग - महाराष्ट्र नगर परिषद कर निर्धारक व प्रशासकीय सेवा

**पदाचे नांव :- सहाय्यक कार्यालय पर्यवेक्षक,सहाय्यक करनिरीक्षक,सहाय्यक विधी व कामगार पर्यवेक्षक,सहाय्यक मिळकत पर्यवेक्षक, सहाय्यक समाजकल्याण माहीती आणि जनसंपर्क पर्यवेक्षक,सहाय्यक खरेदी व भांडार पर्यवेक्षक**

**भरावयाची एकुण पदे - १८**

| अनुशेषाचा प्रवर्ग | एकुण रिक्त पदे | समांतर आरक्षण | | | | | | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महिला | माजी सेनिक | खेळाडु | प्रकल्पग्रसत /भुकंपग्रस्त | अंशकालीन | अपंग (अस्थीव्यंग) | |
| टक्केवारी | | ३०% | १५% | ५% | ५% | ५% | ३% | |
| अ.जा. | ३ | १ | ० | ० | ० | ० | | २ |
| अ.ज. | २ | ० | ० | ० | ० | ० | | २ |
| वि.जा.अ. | १ | ० | ० | ० | ० | ० | | १ |
| भ.ज.ब. | ० | ० | ० | ० | ० | ० | | ० |
| भ.ज.क. | १ | ० | ० | ० | ० | ० | | १ |
| भ.ज.ड. | ० | ० | ० | ० | ० | ० | | ० |
| इ.मा.व. | ३ | १ | ० | ० | ० | ० | | २ |
| वि.मा.प्र. | ० | ० | ० | ० | ० | ० | | ० |
| खुला | ८ | २ | ० | ० | ० | ० | १ | ५ |
| एकुण | १८ | ४ | ० | ० | ० | ० | १ | १३ |

## ७. संवर्ग - महाराष्ट्र नगर परिषद अग्निशमन सेवा.

**पदाचे नांव :- सहाय्यक अग्निशमन पर्यवेक्षक श्रेणी क २.**

**भरावयाची एकुण पदे - ८**

| अनुशेषाचा प्रवर्ग | एकुण रिक्त पदे | समांतर आरक्षण | | | | | | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महिला | माजी सेनिक | खेळाडु | प्रकल्पग्रसत /भुकंपग्रस्त | अंशकालीन | अपंग | |
| टक्केवारी | | ३०% | १५% | ५% | ५% | ५% | ३% | |
| अ.जा. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| अ.ज. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| वि.जा.अ. / भ.ज.ब. / भ.ज.क / भ.ज.ड. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| इ.मा.व. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| वि.मा.प्र. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खुला | ४ | १ | ० | ० | ० | ० | ० | ३ |
| एकुण | ८ | १ | ० | ० | ० | ० | ० | ७ |

## अटी व शर्थी :-

1.वरील संवर्गातील स्थापत्य, विद्युत, संगणक या पदाकरिता नगर परिषदेमधिल कर्माचा-यांनी परीक्षा देऊन उत्तीर्ण झालेल्या कर्माचा-यांमधून २५% पदे राखीव राहतील. तथापी नगर परिषद कर्मचारी उपलब्ध न झाल्यास सरळ सेवेतून भरण्यात येईल.

2.वरील संवर्गातील पदाकरिता नगर परिषदेमधिल कर्मचा-यांनी परीक्षा देऊन उत्तीर्ण झालेल्या कर्माचा-यांमधून २५% पदे राखीव राहतील. तथापी नगर परिषद कर्मचारी उपलब्ध न झाल्यास सरळ सेवेतून भरण्यात येईल.

3.वरील संवर्गातील पदाकरिता नगर परिषदेमाधिल कर्मचा-यांनी परीक्षा देऊन उत्तीर्ण झालेल्या कर्माचा-यांमधून 50% पदे राखीव राहतील.तथापी नगर परिषद कर्मचारी उपलब्ध न झाल्यास सरळ सेवेतून भरण्यात येईल.

4.वरील संवर्गातील पदाकरिता नगर परिषदेमधिल कर्मचा-यांनी परीक्षा देऊन उत्तीर्ण झालेल्या कर्माचा-यांमधून २५% पदे राखीव राहतील. तथापी नगर परिषद कर्मचारी उपलब्ध न झाल्यास सरळ सेवेतून भरण्यात येईल.

| अ.क्र. | पदाचे नाव | अहर्ता |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा पर्यवेक्षक (स्थापत्य) (श्रेणी- क)<br>वेतन श्रेणी ९३००-३४८०० ग्रे.पे.४२०० | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी पदवी (बी.ई.सिव्हील) किंवा पदविका (डी.ई. सिव्हील) आवश्यक<br>२. MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>३. मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक |
| २. | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा पर्यवेक्षक (विद्युत) (श्रेणी- क)<br>वेतन श्रेणी ९३००-३४८०० ग्रे.पे.४२०० | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकी पदवी (बी.ई.विद्युत) किंवा पदविका (डी.ई. विद्युत) आवश्यक<br>२. MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>३. मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक |
| ३. | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा पर्यवेक्षक (संगणक) (श्रेणी- क)<br>वेतन श्रेणी ९३००-३४८०० ग्रे.पे.४२०० | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची संगणक अभियांत्रिकी पदवी (बी.ई.संगणक) किंवा पदविका (डी.ई. संगणक) आवश्यक<br>२. MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>३. मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक |
| ४. | महा. नगरपरिषद लेखापरीक्षण व लेखा सेवा सहाय्यक लेखापाल सहाय्यक लेखापरीक्षक श्रेणी- क<br>वेतन श्रेणी ९३००-३४८०० ग्रे.पे.४२०० | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी आणि Member Of Institution of Cost and Works Accounts (I.C.W.A.) किंवा सनदी लेखापाल (Charterde Accountant) असणे आवाश्यक<br>२. MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>३. मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक |

| | | |
|---|---|---|
| ५. | महा. नगरपरिषद कर निर्धारक व प्रशासकीय सेवा श्रेणी क-२<br>वेतन श्रेणी ५२००-२०२०० ग्रे.पे.२८०० | १.शासन मान्य विद्यापीठाच कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक<br><br>२. खालील पैकी कोणत्याही शाखेतील पदव्युत्तर पदवी असणे आवश्यक<br>. social work public administration<br>- Town & Country planning<br>. political science . Law<br>. Commerce . MBA<br>. Any Branch of Engineering<br>२. MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>३. मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक |
| ६. | महा. नगरपरिषद अग्निशमन सेवा श्रेणी क - २<br>सहाय्यक अग्निशमन स्थानक पर्यवेक्षक<br>वेतन श्रेणी ५२००-२०२०० ग्रे.पे.२८०० | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी आवश्यक<br>२. राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपुर येथील उपस्थानक अधिकारी अभ्यासक्रम (Sub Officers Course) उत्तीर्ण असणे आवश्यक<br>३. MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>४.. मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक |

## टिप :-

१) समांतर आरक्षणासंदर्भात दर्शविण्यात आलेली पद संख्या स्वतंत्र नाही. सदर आरक्षण त्या त्या प्रवर्गातील एकुण पदापैकी आहे. समांतर आरक्षणापैकी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच सामाजिक प्रवर्गातील उमेदवाराव्दारे सदरचे पद भरले जाईल.

२) सदर पदांमध्ये कमी जास्त बदल होण्याचा संभव आहे. म्हणुन याबद्दल उमेदवारांची कोणतीही तक्रार ग्राहय धरण्यात येणार नाही. याबाबतचे अधिकार जिल्हाधिकारी वाशिम यांनी राखुन ठेवले आहेत.

३) सविस्तर जाहिरात www.washim.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे उमेदवारांने सविस्तर जाहिरात व दिलेल्या सर्व सुचना काळजीपुर्वक वाचुन अर्ज सादर करावे.

## पदांकरीता वयोमर्यादा:-

उपरोक्त पदाकरीता दिनांक-०५/०३/२०१७ रोजीची वयोमर्यादा गणली जाईल.

1) उपरोक्त पदाकरीता दिनांक-०५/०३/२०१७ रोजीचे उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.
2) मागासवर्गीय उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे. तथापी उन्नत व प्रगत गटामध्ये क्रिमीलेयर( creamy Layer) मोडणा-या विजा.अ, भज-ब ,भजक , भजड , विमाप्र आणि इ.मा.व प्रवर्गातील उमेदवारांना ही सवलत लागु नाही.

३) सुशिक्षीत बेरोजगारांना अर्थ सहाय या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या तीन वर्षाच्या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर/पदवीधारक अंशकालीन उमेदवारांना वयोमर्यादा ४६ वर्ष इतकी असेल.

४) खेळाडु उमेदवारांकरीता वयोमर्यादेची अट कमाल वयोमर्यादा अधिक ५ वर्षापर्यंत गुणवत्तेनुसार शिथिल करण्यात येईल.

५) माजी सैनिक :- सशस्त्र दलात किमान ६ महिने सलग सेवा केलेल्या माजी सैनिक मधील त्यांची सशस्त्र दलात केलेली अखंड सेवाकाळ अधिक ३ वर्ष एवढा सेवाकाळ त्यांच्या विहीत दिनांकाच्या वयातुन वगळुन त्या दिनांकास येणारे त्यांचे वय विचारात घेतले जाईल. अपंग माजी सैनिकांसाठी वयोमर्यादा ४५ वर्षा पर्यंत राहील.

६) अपंग उमेदवाराचे बाबतीत उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी राहील. अपंग प्रवर्गातील उमेदवाराचे किमान अपंगत्वाचे प्रमाणे ४० टक्के असल्याबाबतच्या स्थायी वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच त्यांची निवड झाल्यानंतर नियुक्ती आदेश निर्गमित करण्यापुर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैद्यकीय मंडळाने तो उमेदवार संबधीत पदावर काम करु शकेल असे प्रमाणपत्र दिल्यानंतरच त्यांची अंतीम नियुक्ती केली जाईल. सदर प्रमाणपत्रावर उमेदवाराचा फोटो असणे आवश्यक आहे.

७) स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशीत पाल्य, उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी राहील.

८) प्रकल्पग्रस्त/ भुकंपग्रस्त उमेदवारांसाठी वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत राहील.

## परिक्षा शुल्क :-

**खुला प्रवर्ग :- रु. ३००/- मागास प्रवर्ग रु. १५०/-**

उक्त परिक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडीया या बँकेच्या कोणत्याही शाखेत ऑनलाईन अर्जासोबत प्राप्त झालेल्या चलनाव्दारेच बँकेच्या वेळेत बॅकेत रोखीने भरणे आवश्यक आहे.

माजी सैनिकांना परिक्षा शुल्क माफ आहे.

**टिप:-** वरील शुल्क हे जिल्हा निवड समितीसाठी आहे. याशिवाय शुल्क जिल्हा निवड समितीच्या नावाने जमा करण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडीया कडुन रु. ६०/- इतके प्रक्रिया शुल्क आकारले जाईल. सदर शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे.

## विशेष सुचना :-

१ अतिरीक्त संवर्ग, आंतर विभागीय समायोजन, विभागीय बदली व इतर विभागीय पदांचा आढावा, इत्यादी कारणामुळे पदसंख्येत (पदसंख्या कमी/जास्त होणे) आरक्षण/समांतर आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

२ नियुक्ती देणेचे नियमात, पदसंख्येत / आरक्षणात बदल करणे, रद्द करणेचे अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी वाशिम यांना राहतील.

३ शासनाने भरतीबाबत/नियुक्ती बाबत वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके, आदेश इत्यादी लागु राहतील.

४ महिला / माजी सैनिक /अंशकालीन कर्मचारी या समांतर आरक्षणातील पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदरची पदे त्याच सामाजिक प्रवर्गातुन समांतर आरक्षण विरहीत म्हणुन भरली जातील.

५. भरतीच्या नियमांमध्ये प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुधारीत शासन निर्णय / परिपत्रकानुसार बदल होऊ शकतो

## अर्ज करण्याची पध्दत :-

**१.** प्रस्तुत पदाकरीता फक्त अधिकृत संकतेस्थळावरुन विहीत पध्दतीने भरलेले ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रीयेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रीयेची माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

**२.** पात्र उमेदवाराला वेब- बेस्ड (Web-Based) ऑनलाईन अर्ज www.washim.nic.in या वेबसाईटव्दारे दि. १४/०२/२०१७ ते दि. २३/०२/२०१७ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकांनतर संकेतस्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

**३.** ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सुचना www.washim.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. अर्ज परिपुर्ण भरल्यांनतर स्टेट बँक ऑफ इंडीया या बँकेत परीक्षा शुल्क भरण्याचे चलन ०३ प्रतीमध्ये उपलब्ध होईल. (उमेदवाराची प्रत, बँकेची प्रत व जिल्हा निवड समितीची प्रत) सदर चलनाची प्रिंट काढुन परिक्षा शुल्क बॅकेत रोखीने या चलनामार्फतच चलनावर दिलेल्या सुचनेतील तारखेनंतर परंतु २३/०२/२०१७ पर्यंत बँकेच्या वेळेत भरणे आवश्यक राहील. उमेदवाराने फी स्टेट बँक ऑफ इंडीयाच्या कोणत्याही शाखेमध्ये भरणे आवश्यक राहील. सदरच्या तिन प्रतीपैकी उमेदवारास त्याची स्वत:ची प्रत व जिल्हा निवड समितीची प्रत स्टेट बँक ऑफ इंडीया चे शाखेकडून परत मिळेल त्यापैकी जिल्हा निवड समितीची प्रत, अशा उमेदवाराने कागदपत्राच्या छाणनीचे वेळी जिल्हा निवड समितीकडे जमा करावी. सदर चलनाची मुळ प्रत असल्याशिवाय उमेदवाराच्या कागदपत्रांची छाणनी केली जाणार नाही तसेच चलनाची मुळ प्रत परिक्षेच्या दिवशी सोबत आणावी.

**४.** बँकेमध्ये विहीत परिक्षा शुल्काचा चलनाव्दारे भरणा केल्यानंतर बँकेकडुन प्राप्त झालेल्या Transaction ID ची नोंद संकेतस्थळावर जाऊन करावी व ऑनलाईन अर्ज अपडेट करावा. अर्ज अपडेट करतांना परिक्षा शुल्क चलॉन मार्फत बँकेत जमा केल्यानंतर चलॉनवरील Transaction ID नोंदवून अर्ज अपडेट करणे आवश्यक आहे. असे अपडेट न केलेले **ऑनलाईन अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.**

**५.** बँकेकडुन प्राप्त झालेला Transaction ID एकापेक्षा अधिक अर्जाकरीता वापरु नये Transaction ID एकापेक्षा अधिक अर्जाकरीता वापरल्यास एकही अर्ज विचारात घेतला जाणार नाहीत.

**६.**ऑनलाईन पध्दतीने अर्ज सदर करतांना उमेदवाराजवळ स्वत:चा चालु ई -मेल आयडी असणे आवश्यक आहे. पुढील सर्व पत्रव्यवहार उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेल्या ई-मेल आयडी व्दारे होणार असल्याने अचुक - ई मेल आयडी नोंदवीणे आवश्यक आहे व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराजवळ स्वत:चा अद्यावत (Latest) पासपोर्ट साईज फोटो असणे आवश्यक

आहे तसेच स्वत:चा फोटो जिल्हा निवड समितीच्या सुचनेनुसार विहीत पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.

**७.** ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाच्या बाबींचा तपशिल **www.washim.nic.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

८.उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर दि. २८/०२/२०१७ ते दि. ०५/०३/२०१७ पर्यंत www.washim.nic.in या संकेतस्थावरुन परिक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावे.
प्रवेशपत्रावर उमेदवाराने त्याचे पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्रावर चिकटवुन त्यावर राजपत्रित अधिकाऱ्यांकडुन सांक्षाकीत करुन घ्यावे.

**पदांच्या निवडीसाठी कार्यपध्दती अटी व शर्ती :-**

**१.** उमेदवाराचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक कागदपत्रे अन्य कागदपत्रे जोडणे आवश्यक नाही. परंतु ऑनलाईन अर्जामध्ये संपुर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही त्रृटी राहील्यास व अर्ज नाकारल्या गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील या बाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही तसेच ऑनलाईन अर्ज भरतांना खोटी किंवा विसंगत / दिशाभुल माहिती भरलेली निदर्शनास आल्यास सबंधीत उमेदवारावर फसवणुकीचा फौजदारी गुन्हा दाखल होऊ शकतो याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

## २. अंतिम निवड

**अ)** उमेदवाराची अंतिम निवड ही लेखी परीक्षेमधे मिळालेल्या एकुण गुणांच्या आधारे केली जाईल.

**ब)** एकाच स्थानासाठी ( Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास शासन निर्णय ५.१०.२०१५ नुसार उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.

९. उमेदवाराची लेखी परिक्षा ही कोणत्याही कागदपत्रांची पूर्व तपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे लेखी परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाही. नियुक्ती पुर्वी, मुळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला, आवश्यक असल्यास अदययावत नॉनक्रिमीलेअर दाखला , तसेच आवश्यक ती कागदपत्रे / साक्षांकीत प्रमाणपत्रे (साक्षांकन हे केंद्र / राज्यशासनाचे राजपत्रित अधिकारी / पोस्टमास्तर प्राचार्य व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिका-यांनीच केलेले असावे) इ.ची छाननी संबंधीत नियुक्ती प्राधिकारी स्तरावर केली जाईल. त्यावेळी मुळ प्रमाणपत्रे दाखविणेही बंधनकारक राहील. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत. छानणीअंती वरील प्रमाणपत्रामध्ये त्रृटी आढळल्यास/माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाहीत/नियुक्ती रद्द होईल तसेच या पदासंबधी शासनाकडुन आवश्यक सहमती प्राप्त झाल्यानंतरच उमेदवारांना नियुक्तीचे आदेश देण्यात येतील.

१०. अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा व त्याबाबतचे सक्षम अधिकारी यांच्याकडील प्रमाणपत्र त्यांचेकडे असणे आवश्यक आहे.

११. सदर पदांसाठी आवश्यक अर्हता असणारा महाराष्ट्र राज्यातील कोणताही उमेदवार अर्ज करु शकेल.

१२.गुणवत्ता यादीमध्ये येणा-या उमेदवारांना मुळ कागदपत्राची तपासणी करण्याकरीता बोलावण्यात येईल. उमेदवारांना कागदपत्रे तपासणीच्या वेळी मुळ कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत. छानणी अंती प्रमाणपत्रामध्ये त्रृटी आढळल्यास/ माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही.

१३. उक्त पदांसाठी छानणी न करता जाहीरातीनुसार परिपुर्ण अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी परिक्षा केंद्राचा सांकेतांक क्रमांक,वेळ व दिनांक इत्यादी तपशिल www.washim.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र www.washim.nic.in या संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबधीत उमेदवाराची राहील.

१४. लेखी परिक्षेसाठी व कागदपत्रांच्या छाननीसाठी उमेदवारास स्वखर्चाने यावे लागेल.

१५.जिल्हा रोजगार व स्वयरोजगार मार्गदर्शन केंद्र वाशिम या कार्यालयात नांव नोंदणी केली असली तरी वरील पदासाठी विहीत नमुन्यात स्वतंत्रपणे रितसर ऑनलाईन अर्ज करणे व परिक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

१६. विहीत वयोमर्यादेतील इच्छुक शासकीय/ निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांच्या परवानगीने भरावेत व अशा परवानगीची प्रत कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

१७. नियुक्ती झाल्यानंतर उमेदवारांना मा.आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांचे आदेशास अधिन राहुन जिल्हयातील कोणत्याही नगरपरिषदांमध्ये नियुक्ती देण्यात येईल. नियुक्तीच्या ठिकाणी उमेदवारास १५ दिवसाचे आत रुजु होणे आवश्यक राहील.

१८. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. बीसीसी -२०११/ प्र.क्र १०६४/२०११/१६६- ब दिनांक १२/१२/२०११ नुसार निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांना नियुक्तीच्या दिनांकापासुन सहा महिन्याच्या आत त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र संबधीत जात पडताळणी समितीकडुन प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१९.महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती , विशेष मागासवर्ग, इतर मागासवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनियम २००१ ( सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र ८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९ जानेवारी २००४ पासुन अमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर ) तत्व विजा अ , भजब , भजक ,भजड , विमाप्र व इमाव यांना लागु आहे. सदर प्रवर्गातील उमेदवाराकडे चालू आर्थिक वर्षाचे दि. ३१ मार्च २०१७ पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमीलेअरचे सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. नॉन क्रिमीलेअरचे तत्व अनुसुचित जाती/जमाती व्यतिरीक्त इतर सर्व मागास प्रवर्गाना लागु राहील.

२०. उक्त नमुद पदासाठी घेण्यात येणा-या लेखी परिक्षेमध्ये गुणवत्ता यादीत येणा-या उमेदवारांना त्यांचे पदासाठी आवश्यक असणारे कागदपत्र पडताळणीच्या वेळी त्यांचे शैक्षणिक अर्हता, जात प्रमाणपत्र, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र संगणक हाताळणी, अर्हता प्रमाणपत्र, जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी प्रमाणपत्र, शासकीय /निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या विभागप्रमुखांच्या परवानगीने भरले असल्यास अशा परवानगीचे पत्र व इतर आवश्यक सर्व मुळ कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे. तसेच महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील

परिपत्रक दिनांक ०१/०७/२००५ व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ नुसार विहीत नमुन्यातील लहान कुटुंब प्रतिज्ञापत्र विवाहीत/अविवाहीत उमेदवारांनी सदर करणे अनिवार्य आहे.

२१. शासन वित्त विभाग निर्णय क्र. अनियो/१०/०५८/१२६ सेवा ४/दिनांक ३१/१०/२००५ नुसार दि.०१ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर निवड होणा-या उमेदवारांना नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु राहील. त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना ( म्हणजे म.ना.सेवा ( निवृत्तीवेतन) नियम १९८२ व म.ना.से ( निवृतीवेतनाचे अंशराशीकरण ) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह योजना लागु होणार नाही.

२२. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोदणी केली असल्यास नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

२३. उमेदवाराने निवड प्रक्रियेच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरवण्यात येईल.

२४. अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे उमेदवारांनी समजु नये.

२५. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सुचना व भरतीची जाहिरात www.washim.nic.in या संकेततस्थळावर उपलब्ध आहे.

२६. ऑनलाईन पध्दतीने उमेदवाराने अर्ज भरल्यांनतर जोपर्यंत उमेदवार चलॉनद्वारे परिक्षा शुल्क बँकेत भरल्याचे Transaction ID ऑनलाईन उमेदवार अर्जावर स्वत: बिनचुक Update करीत नाही तोपर्यंत त्याचा अर्ज ग्राहय धरला जाणार नाही.

## समांतर आरक्षणांतर्गत असलेल्या कोटयासाठी अटी व शर्ती

### अ) अंशकालीन उमेदवारासाठी :-

अंशकालीन उमेदवारांचे बाबतीत त्यांनी सुशिक्षित बेरोजगार अर्थसहाय्य योजनेअंतर्गत कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेले पाहिजे. तसेच सदरच्या अनुभवाची नोंद रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये केलेली असली पाहीजे. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचा-यांनी त्याच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र कागदपत्राच्या तपासणीच्यावेळी सदर करणे आवश्यक राहील.

**ब) माजी सैनिक उमेदवारासाठी :-**गुणवत्तायादीमध्ये येणा-या माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची छायांकीत / सांक्षाकीत प्रत व इतर आवश्यक कागदपत्र तपासण्याच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे. निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिका-यांकडुन पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्ती आदेश देण्यात येणार नाही.

**क)महिलांसाठी असलेले आरक्षण :-** महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक ८२/२००१/प्र.क्र.४१५/कावि २ दिनांक २५ मे २००१ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आरक्षणा अतर्गत अर्ज करणा-या महिला उमेदवारांनी चालू आर्थिक वर्षाचे (अर्थात दिनांक ३१.३.२०१७ पर्यत वैध असलेले ) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्या बाबतचे प्रमाणपत्र तपासणीच्या सादर करणे आवश्यक आहे.

## परीक्षेचे स्वरुप व निवड पध्दती:-

| पदाचा संकेतांक | पदनाम | परीक्षेसाठी गुण | |
|---|---|---|---|
| | | लेखी परीक्षा | एकुण |
| १ | महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य) (श्रेणी - क) | २०० | २०० |
| २ | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा संवर्ग (विद्युत्) (श्रेणी -क) | २०० | २०० |
| ३ | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा संवर्ग (संगणक) (श्रेणी-क) | २०० | २०० |
| ४ | महाराष्ट्र नगरपरिषद लेख व लेखपरिक्षण सेवा संवर्ग (श्रेणी -क) | २०० | २०० |
| ५ | महाराष्ट्र नगर परीषद कर निर्धारक व प्रशासकीय (सेवा श्रेणी क - २) | २०० | २०० |
| ६ | महाराष्ट्र नगरपरिषद अग्निशमन सेवा संवर्ग (श्रेणी क-२) | २०० | २०० |

## परीक्षेचे स्वरुप :-

१) परीक्षा ही ओएमआर पध्दतीने होणार आहे .

२) लेखी परीक्षा एकुण गुण २०० (भाग १ व भाग २ मिळून )

भाग १ - ५० प्रश्न प्रती प्रश्न २ गुण एकूण गुण १०० (मराठी/इंग्रजी/सामान्य ज्ञान/बौध्दिक क्षमता चाचणी )

भाग २ - ५० प्रश्न प्रती प्रश्न २ गुण एकूण गुण १०० ( व्यावसायीक अभ्यासक्रमाशी संबंधित )

## टिप :-

लेखी परीक्षा बहुपर्यायी वस्तुनिष्ठ स्वरुपाची असेल त्यासाठी १०० प्रश्नांना प्रत्येकी २ गुण याप्रमाणे एकूण २०० गुण असतील १०० प्रश्नापैकी ५० प्रश्न संबंधित सेवेच्या (पदाच्या ) आवश्यक शैक्षणिक पात्रतेच्या स्तरावरील दर्जाचे असते उर्वरीत ५० प्रश्न मराठी इंग्रजी व सामान्य क्षमता चाचणीशी निगडीत असतील निगेटीव्ह मार्कीग पध्दत असणार नाही **लेखी परीक्षा दिनांक ०५/०३/२०१७** रोजी घेण्यात येईल लेखी परीक्षेमधून पात्र होणा-या उमेदवारांना मुळकागदपत्रे तपासणीचा दिनांक जिल्हयाच्या वेबसाईटवर सूचना प्रसिध्द करण्यात येईल.

लेखी परीक्षेमधे उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधित मुळ प्रमाणपत्र तपासणीसाठी उपलब्ध करुन दयावी लागतील अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

वरील पदासाठी गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकूण गुणांच्या किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. लेखी परीक्षेत बसलेल्या उमेदवारांना त्यांना मिळालेले गुण www.washim.nic.in या संकेत स्थळावर पाहता येईल या गुणवत्ता यादीनुसार सामाजीक / समांतर आरक्षणा निहाय अंतरिम गुणवत्तायादी उक्त संकेत स्थळावर जाहीर केली जाईल.

वरील गुणवत्ता यादीमधील गुणानुक्रमे पात्र व आरक्षण विचारात घेवून कागदपत्राच्या पडताळणीसाठी पात्र करण्यात आलेल्या उमेदवारांनी संकेतस्थळावर दिलेल्या सुचनानुसार त्यांच्या कागदपत्राच्या छाननीसाठी ठरवून दिलेल्या दिनांकास वेळेवर व ठरवून दिलेल्या ठिकाणी मुळ कागदपत्राच्या छायांकित प्रतीसह उपस्थित

राहणे आवश्यक राहील. सदर दिवशी वेळेत  व ठिकाणी सदर उमेदवार कागदपत्राच्या छाननीसाठी अनुपस्थित राहील्यास त्याचे निवडीबाबत जिल्हा निवड समिती विचार करणार नाही.

**रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | भरती प्रकिया कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| १ | अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा कालावधी | १४/०२/२०१७ ते २३/०२/२०१७ |
| २ | बॅंकेत विहीत चलनाव्दारे परीक्षाशुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक | २४/०२/२०१७ |
| ३ | लेखी परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा कालावधी | २८/०२/२०१७ ते ०५/०३/२०१७ |
| ४ | लेखी परीक्षा | ०५/०३/२०१७ |

**टिप :- अर्ज ऑनलाईन पद्धतीने दिनांक २३/०२/२०१७ पर्यंत दुपारी १२.०० वाजेपर्यंत भरण्यात येतील.**

**विशेष सुचना :-**

१.  या परीक्षेत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना जरी उमेदवारांना कोणतेही कागदपत्र सादर करायची आवश्यकता नाही तरीही ज्या उमेदवारांकडे पदाकरीता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी विनाकरण अर्ज करु नये

२. अर्जदारांना अर्ज भरण्यासंदर्भात काही तांत्रिक अडचणी असल्यास त्यासाठी  ७४४७७८८६६९ या दुरध्वनीवर संपर्क साधावा (भरती प्रक्रीयेत अर्ज भरण्याकरीता कुठलीही  माहिती  जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पुरविली जाणार नाही .

३. भरती प्रक्रीयेसंबंधिची संपूर्ण माहिती तसेच उमेदवारांकरीता असलेल्या सूचना हया वेबसाईटवर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.   ती पाहण्याची जबाबदारी ती पूर्णत: उमेदवारांची   असेल त्याकरीता उमेदवारांना वेगळा पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

४. उमेदवाराला भरती प्रक्रीये संबंधितच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे लागेल.

दिनांक  :-  १४.२.२०१७

स्वा/-
**सदस्य सचिव**
**जिल्हा निवड समिती तथा**
**निवासी उपजिल्हाधिकारी, वाशिम**

स्वा/-
**अध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हाधिकारी, वाशिम**